नि.फौज केस क्र. ७२/२०२२
निशाणी क्र. ५४

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – संजय प्रल्हाद बांबल
वय सुमारे - ४८ वर्षे व्यवसाय - शेती
राहणार – - शेलगांव आटोळ, चिखली ता. बुलढाणा
जिल्हा – बुलडाणा

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून</u>**

मी आरोपींना ओळखतो. आज आरोपी क्र. ३,५ व ६ गैरहजर आहे. मी त्यांना पाहिल्यास ओळखू शकतो. बाकीचे आरोपी न्यायालयात हजर आहे. घटना हि दि. १३.०९.२०११ रोजी संध्याकाळी ६.०० ते ६.३० वा. आरोपींच्या घरा समोर घडली. त्यावेळी मी व माझी पत्नी शेतातून आमच्या घराकडे येत होतो. आरोपीच्या घरासमोर श्रीकृष्ण अंभोरे व शिलाबाई अंभोरे यांचा वाद आरोपी सोबत सुरु होता. आम्ही शेतातून घरे येत असतांना आम्ही त्यांचा वाद सोडवण्यासाठी तेथे गेलो. तेव्ही सर्व आरोपींनी मला व माझ्या पत्नीला लाथा बुक्क्यांनी व तसेच काठीने मारहाण केली. त्यानंतर माझी पत्नी बेशुध्द पडली. त्यामुळे मी तीला बुलढाणा येथील शासकीय रुगणालय येथे घेवून गेलो. दवाखान्यातून सुट्टी झाल्यानंतर मी आरोपी विरुध्द रिपोर्ट दिला होता. भांडणामध्ये रंजना सुभाष पवार व विजया लक्ष्मण पवार हिने माझ्या पत्नीच्या गळयातील सोन्याची पोत ओढली होती त्यामुळे आमचे नुकसान झाले.

०२. आता मला अभिलेखावरील रिपोर्ट दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र. ५५** देण्यात येत आहे. आता मला अभिलेखावरील प्रथम खबर अहवाल दाखवण्यात आले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पोलीसांनी माझे बयाण नोंदवले होते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. टि.ए. शेख यांचेतर्फे</u>**

०३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्यामध्ये पुर्वीपासून शेतीचा वाद सुरु आहे. मी रिपोर्ट कोणत्या तारखेला दिला होती त्याची तारीख मला आता सांगता येणार नाही. आरोपी व श्रीकृष्ण व शिला अंभोरे यांचे मध्ये कशावरुन वाद सुरु होते या

बद्दल मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, गावातील अंढेरा पोलीस स्टेशन येथे जाण्यासाठी अर्धा तास ऐवढा वेळ लागतो. हे म्हणणे खरे आहे की, शेलगांव आटोळ येथे पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष व सरपंच उपलब्ध आहे. घटनेच्या वेळी  पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष व सरपंच यांना बोलवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पोलीसा मार्फत दवाखान्यात गेलो नाही. मी पोलीसांना रिपोर्ट देते वेळी सांगीतले होते की, माझ्या पत्नीच्या गळयातील दागदागीणे तोडून आरोपींनी ते नेले, सदरचा मजकूर पोलीसांनी माझ्या रिपोर्टमध्ये का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

०४.		हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणा व्यतीरिक्त आमचे अजून न्यायालयात प्रकरण सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी रिपोर्ट घटनेच्या दुस-या दिवशी दिला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी त्यापुर्वी आमच्या विरुध्द गुन्हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला व माझ्या पत्नीला चापटा बुक्क्यांनी व काठीने मारहाण केल्याचे मी खोटे सांगतो. पोलसांनी माझे बयाण घेतले होते किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी ऑटे चालवतो. हे म्हणणे खरे आहे की, दि.१३.०९.२०११ रोजी माझी देऊळगांव राजा येथील न्यायालयात तारीख होती. दि.१३.०९.२०११ रोजी माझी देऊळगांव न्यायालयात तारीख होती किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असल्याप्रमाणे कोणती घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना फसवण्यासाठी खोटी तक्रार दाखल करुन खोटा गुन्हा नोंदवला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला व माझ्या पत्नीला मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास  नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2026.03.11 17:51:47 +0530

**( श्रीमती एस.एच. उके )**

दि. ११.०३.२०२६ — न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली.